**म.स.कौ.हिं.का. अर्ज क्र. ०४/२०२४ निशाणी ०५ खालील आदेश.**

(हिना शेख व एक वि. जिशान शेख व इतर)

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा कौटूंबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ (१) व (२) अन्वये गैरअर्जदारा कडून मुळ अर्ज निकाली होई पावेतो अंतरीम निर्वाह भत्ता म्हणुन रक्कम रु. १५,०००/– व घरभाडे म्हणुन रक्कम रु. २,०००/– अशी एकुण दरमहा रक्कम रु. १७,०००/– ची मागणी केली आहे.

**अर्जदाराचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

२. अर्जदाराच्या अर्जातील कथनाप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ हे तिचे पती असुन गैरअर्जदार २ व ३ हे अनुक्रमे सासरे व सासु आहेत. गैरअर्जदार क्र.२ आणि ३ यांचा त्यांच्या विवाहाला विरोध होता. गैरअर्जदार नेहमी अर्जदाराकडे लग्न करण्यासाठी विनवणी करीत होते. त्यावेळी गैरअर्जदार पि.ओ.पि. च्या कामाला जायचे व आपल्या गरजा भागवायचे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हे कमावते आहेत आणि तिचा सांभाळ योग्यरित्या करतील या आशेवर अर्जदाराचा निकाह दिनांक २२/०४/२०१८ रोजी संपन्न झाला. सदर निकाहाचा संपुर्ण खर्च म्हणजेच सव्वा ते दिड लाख रुपये अर्जदाराच्या आई वडीलांनी केला. त्यानंतर अर्जदाराच्या वडीलांनी अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांना राहण्यासाठी भाड्याने एक घर व किराणा घेऊन दिला.

३. निकाहा नंतर तिसऱ्याच दिवशी गैरअर्जदार क्र.१ ने तिच्यासोबत भांडण केले. दिनांक २५/०४/२०१८ रोजी कडुलिंबाचे पान बारीक करण्याच्या कारणावरुन अर्जदाराला अश्लील शिवीगाळ केली व मारहाण केली. तसेच तिचा गळा दाबुन बुक्यांनी मारहाण केली. त्यात तिला गंभीर दुखापत झाली. गैरअर्जदार क्र.२ आणि ३ यांनी त्या दोघांना त्यांच्या घरी बोलावुन घेतले. त्यानंतर अर्जदाराला एक महिणा चांगली वागणुक मिळाली, नंतर पुन्हा त्रास देणे सुरु केले. सन २०१८ च्या रमजान ईद च्या सनासुदीच्या वेळेस तिच्यासोबत विनाकारण

वाद घातला. तेव्हा अर्जदार सहा महिण्यांची गर्भवती असतांना सुध्दा गैरअर्जदार क्र.१ ने तिला मारहाण केली. त्यावेळी गैरअर्जदार क्र.३ ने अर्जदाराचा घटस्फोट घे व तुझे दुसरे लग्न लावुन देतो असे गैरअर्जदार क्र.१ ला म्हणाली. गैरअर्जदार अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेत असे.

**४.** दिनांक ०३/०२/२०१९ रोजी अर्जदाराने बाळाला जन्म दिला. ऑगस्ट २०१९ मध्ये गैरअर्जदार क्र.२ आणि ३ यांनी तिच्यासोबत वाद घालुन तिला घरातुन निघुन जा असे म्हटले. तसेच तिच्या आई वडीलांबद्दल वाईट साईट बोलु लागले. त्यात त्यांचा वाद झाला. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार बाईच्या बाळाला हिसकावुन ठेवले व पलंगावर ठेवुन त्याचा गळा दाबला. तेवढ्यात अर्जदार व तिच्या आई वडीलांनी तिच्या बाळाला सोडविले. नोव्हेंबर २०१९ मध्ये गैरअर्जदार अर्जदाराच्या माहेरच्या घरी आले व अर्जदार क्र.२ ला सोबत घेऊन निघुन गेले. त्यावेळी अर्जदार क्र.२ केवळ ९ महिण्यांचा होता. त्याला आईच्या दुधाची गरज असतांना सुध्दा जाणीवपुर्वक आई पासुन दुर ठेवले. अर्जदाराने बाळाला परत मागितले असता गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी त्यांच्यासोबत वाद घातला. त्यावेळी गैरअर्जदाराने अर्जदाराच्या वडीलांना मारहाण केली. जानेवारी २०२० मध्ये गैरअर्जदार अर्जदाराच्या वडीलांकडे गेले व अर्जदारांसोबत राहण्याची ईच्छा व्यक्त केली. त्यावेळी आई वडीलांच्या घराशेजारी एक घर भाड्याने घेतले व ते तेथे राहु लागले. तेव्हा गैरअर्जदार क्र.१ तिला विनाकारण मारहाण करीत होता. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारावर तुझे तुझ्या वडीलांसोबत काहीतरी सुरु आहे असा गलीच्छ आरोप लावला. अर्जदाराने सदर आरोपांना विरोध केला असता गैरअर्जदाराने तेलाच्या केटलीने मारहाण केली. त्यानंतर गैरअर्जदार त्याचे कपडे थैल्यात भरुन निघुन गेला. त्यामुळे अर्जदार तिच्या माहेरी परत गेली. त्यानंतर सलग २ वर्ष गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारांपासुन जाणीवपुर्वक दुर राहिला. दिनांक ११/०३/२०२२ रोजी गैरअर्जदाराने अर्जदारा सोबत राहण्याची ईच्छा व्यक्त केल्यामुळे १००/– रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर साक्षीदारांसमक्ष लिहुन द्या अशी मागणी अर्जदाराने केली. दिनांक १९/०३/२०२२ रोजी चांदभाई शेख व असलमभाई शेख यांच्या समक्ष गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराला सोबत घेऊन जाण्याची व त्रास न देण्याचा करारानामा लिहुन दिला. त्यानंतर ते सिंदेवाही येथे भाड्याच्या खोलीत राहु लागले. त्या कालावधीत गैरअर्जदाराने त्यांना कधीही चांगली वागणुक दिली नाही. गैरअर्जदार अर्जदाराला धमकावण्यासाठी चाकु सोबत घेऊन झोपत असे. त्यांना उपजिवीकेसाठी व इतर मुलभुत गरजांसाठी पैसे देत नसे.

५. गैरअर्जदार सद्या सिताबाई शेंडे स्कुल, सिंदेवाहीच्या स्कुलबसवर वाहन चालक म्हणुन कार्यरत आहे. तसेच भाजी मार्केटच्या गाडीवर सुध्दा चालक म्हणुन जातो. यामध्यमातुन तो दरमहा २० ते २५ हजार रुपये कमवितो इत्यादी कथन करुन अर्जदाराने रक्कम रु.१७,०००/– अंतरीम पोटगीची मागणी केलेली आहे.

६. गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी निशाणी क्र. १६ वर संयुक्तीक उत्तर दाखल केले आहे. त्यांच्या विरोधात अर्जदाराने केलेले सर्व आरोप त्यांनी नाकारलेले आहेत. विवाह संबंध त्यांना मान्य आहे. गैरअर्जदार सिताबाई शेंडे शाळेत स्कुलबस चालवितो ही बाब त्यांनी मान्य केलेली आहे.

७. अर्जामधील कथने, गैरअर्जदार यांचे लेखी उत्तर, अभिलेखावर दाखल प्रथमदर्शनी पुरावा व अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद यांचा विचार करता, सदर अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | अर्जदार हे गैरअर्जदारा कडून कौटूंबिक हिंसाचाराने पिडीत असल्याचे शाबीत होते काय? | .. | होय. |
| २ | अर्जदार हे त्यांच्या मागणीप्रमाणे दरमहा अंतरीम निर्वाह खर्च म्हणुन रक्कम रु.१५,०००/– मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास स्वरुप काय ? | .. | अंशतः होय. अंतीम आदेशाप्रमाणे |
| ३ | अर्जदार हे त्यांच्या मागणीप्रमाणे दरमहा घरभाडे म्हणुन रक्कम रु.२,०००/– मिळण्यास पात्र आहे काय ? | .. | नाही. |
| ४ | आदेश काय? | .. | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |

–: **कारणमिमांसा:–**

**मुद्दे क्र. १ ते ३ बाबतः–**

८. कौटूंबीक हिंसाचारा पासुन स्त्रीयांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २३

अनुसार अंतरीम मागणीचा अर्ज निकाली करते समयी अर्जदारास ती गैरअर्जदारा यांचे पासुन कौटूंबीक हिंसाचाराने पिडीत असल्याचे प्रथमदर्शनी शाबीत करणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा अर्ज निकाली करते समयी उभय पक्षकारांनी त्यांची केस पुर्णतः शाबीत केली आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे नाही. अर्जदाराने तीच्या मुळ अर्जात गैरअर्जदारा क्र. १ ते ३ यांनी केलेल्या कौटूंबीक हिंसाचारामुळे ती विभक्त राहत असल्याचे कथन केले आहे. त्याचप्रमाणे तिने गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी तिचा शारिरीक व मानसिक छळ केल्याचे कथन केलेले आहे. कौटूंबिक हिंसाचाराच्या संदर्भातील संरक्षण अधिकारी यांनी दिलेल्या अहवालामध्ये परिच्छेद क्र. १ ते ७ मध्ये सकृतदर्शनी गैरअर्जदारांनी अर्जदाराला शारिरीक व मानसिक त्रास देऊन तिचा छळ केल्याचे दिसुन येत आहे. गैरअर्जदारांनी नातेसंबंध मान्य केलेले आहेत.

**९.** अर्जदाराच्या वतीने मत्ता व दायीत्वचे शपथपत्र निशाणी क्र.६ वर दाखल करण्यात आले आहे. त्यामध्ये त्यांना दरमहा रक्कम रु.१७,०००/– खर्च उदरनिर्वाह म्हणजेच घरभाडे, वैद्यकिय खर्च, गृहखर्च इत्यादी साठी लागतात असे कथन केले आहे. तसेच गैरअर्जदाराकडे मौजा सिंदेवाही येथे शेती असुन त्यातुन तो ५ लाखांचे उत्पन्न मिळवितो असे कथन केलेले आहे. परंतु, अर्जदार आज रोजी भाड्याच्या घरात राहते या संदर्भात कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदार क्र.२ चे आजचे वय केवळ ५ वर्ष आहे. अर्जदार यांनी केलेल्या कथनानुसार नक्कीच स्वतःची उपजिवीका स्वतः करण्यात असमर्थ आहेत असे सकृतदर्शनी दिसुन येते. गैरअर्जदारांनी विवाह संबंध मान्य केलेले आहेत. एकंदरीत, परिस्थिती पाहता सकृतदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार क्र. १ आणि २ हे पिडीत व्यक्ती आहेत. त्यांचा उदरनिर्वाह करण्यास ते असमर्थ आहेत. अर्जदाराने जरीही शेतीचा उल्लेख केलेला आहे तरीही गैरअर्जदाराकडे शेती आहे हे दाखविणारा दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही. वरील, संपुर्ण परिस्थिती आणि अर्जदार व गैरअर्जदार यांच्या कुटूंबियांचे जिवनमान पाहता गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ आणि २ यांना दरमहा एकत्रीतपणे रक्कम रु.२,५००/– (रक्कम रु. दोन हजार पाचशे फक्त) अंतरीम पोटगी म्हणुन द्यावी असे निर्देश देणे योग्य होईल. त्याचबरोबर अर्जदाराने ती स्वतःहा भाड्याच्या घरात राहत असल्या संदर्भात कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे अंतरीम घरभाडे भत्ता मिळण्यास ती पात्र नाही. **करीता, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी, मुद्दा क्र. २ चे उत्तर अंशतः होकारार्थी व मुद्दा क्र. ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.**

**मुद्दा क्र. ४ करीता :-**

**१०.** वरील कारणमिमांसा विचारात घेता मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र. ३ चे उत्तर नकारार्थी नोंदविले आहे. अर्जदार क्र. १ आणि २ ह्या एकत्रीतपणे रक्कम रु. २५००/- **(रक्कम रु. दोन हजार पाचशे फक्त)** प्रति महिना अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहेत. करीता, मी मुद्दा क्र. ४ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ आणि २ यांना एकत्रीतपणे दरमहा रक्कम रुपये २,५००/- **(रक्कम रु. दोन हजार पाचशे फक्त)** अंतरीम आर्थीक सहाय्य म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखे पासुन पुढील आदेश होईपावेतो द्यावेत.

३. प्रस्तुत आदेशाची प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

PANDURANG ANKUSH GHOTE
Digitally signed by PANDURANG ANKUSH GHOTE
Date: 2025.07.09 17:24:36 +0530

दि.०८/०७/२०२५.

**(श्री. पा. अ. घोटे)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सिंदेवाही.

**–: प्रमाणपत्र :–**

मी प्रमाणीत करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव :– जितेंद्र बाबुराव बोरकर,

न्यायालयाचे नांव :– न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग, सिंदेवाही.

पिडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक :– ०८/०७/२०२५

स्वा/–
लघुलेखक, श्रेणी– ३